जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक ३१० दिनांक ०४/११/२०२१

## अंगात कालीमाता येते असे सांगुन महिलांची फसवणुक करणाऱ्या भोंदुबाबाला अटक करुन रु. १२,०५,२००/- किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत- माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटिकरण शाखेची कामगिरी

माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक १८/१०/२०२१ रोजी ते दिनांक २२/१०/२०२१ रोजी दरम्यान वसई रेल्वे स्टेशन पुर्व या ठिकाणी कालीमाता अंगात येते, सात दिवसांची पुजा करुन घरातील दोष काढुन टाकतो असे सांगुन महिला व कुटूंबियांची फसवणुक करणारा आरोपी नामे नुर अजिजऊल्ला सलमानी, वय ३२ वर्षे, रा. मिरारोड पुर्व, ठाणे यास अटक केली. अटक आरोपी याने तपासा दरम्यान मागील ४ वर्षापासुन वसई, विरार, ठाणे, मुंबई, नवी मुंबई, वापी (गुजरात), इत्यादी ठिकाणी फसणुक करत असल्याची माहिती दिली आहे. आरोपीकडुन एकुण ३ गुन्हे व इतर ठिकाणी केलेल्या फसणुकीतील एकुण ३०१.३ ग्रॅम सोन्याचे दागिने अंदाजे कि.रु. १२,०५,२००/- किंमतीचे जप्त करण्यात आले आहेत.

अटक आरोपीकडुन खालील ३ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

| अ.क्र. | गु.र.क्र. व कलम | पोलीस ठाणे |
|---|---|---|
| १. | गु.र.क्र. ४०८/२०२१ कमल ४२०,४०६ भा.दं.वि. | माणिकुपर पोलीस ठाणे |
| २. | गु.र.क्र. ३६५/२०२१ कमल ४२० भा.दं.वि. | नालासोपारा पोलीस ठाणे |
| ३. | गु.र.क्र. १२२०/२०२० कमल ४२० भा.दं.वि. | कस्तुरबा पोलीस ठाणे, मुंबई |

सदरची कारवाई श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- २, श्री. प्रदीप गिरीधर, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. भाऊसाहेब आहेर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, माणिकपूर पोलीस ठाणे पो.नि. अभिजित मडके (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. श्री. सचिन सानप, पो.उ.नि. रोहिणी डोके, पो.हवा शैलेश पाटिल, पो.ना. धनंजय चौधरी, पो.ना. शामेश चंदनशिवे, पो.शि. गोपाळ कोळेकर, प्रविण कांदे व म.पो.शि. पुजा कांबळे यांनी केलेली आहे.

------oooo------